N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): ठाणे शहर **P.S.**(ठाणे): मुंब्रा

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0849 **Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ)**:**23/08/2023 01:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना)**:**

1. **Day**(दिवस): मंगलवार
   **Time Period** (कालावधी):

   **Date From** (दिनांक पासून)**:** 22/08/2023
   **Date To** ( दिनांक पर्यंत)**:** 22/08/2023
   **Time From** (वेळेपासून)**:** 11:19 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत)**:** 14:47 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे)**:**

**Date** (दिनांक )**:** 23/08/2023 **Time** (वेळ)**:** 01:16 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ )**:**

**Entry No.** (नोंद क्र.)**:** 001

**Date & Time** (दिनांक आणि वेळ)**:** 23/08/2023 01:16 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार)**:** लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ)**:**

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर)**:**
दक्षिण, 5 किमी **Beat No.** (बिट क्र.)**:**

(b) **Address** (पता)**:** दिवा प्रभाग समिती,कौसा उपप्रभाग कार्यालय,ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास)**:**

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District(State)** (जिल्हा(राज्य))**:**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मोहमद युसुफ शेख

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1958

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 706,रशिद कंपांऊंड,आक्सा रेसिडेन्सी,कौसा, मुंब्रा,ठाणे,मुंब्रा,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 706,रशिद कंपांऊंड,आक्सा रेसिडेन्सी,कौसा, मुंब्रा,ठाणे,मुंब्रा,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9869018594

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गिरीश रतन अहिरे | | | 1. 701,पारसिक नगर,ओम साई टवर,कळवा, ,ठाणे,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | आसीम इनायत शरीफ | | | 1. 402,डोंगरे नगर,रशीदा अपार्टमेंट,कौसा,ठाणे,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फिर्यादीने फिर्याद दिल्याप्रमाणे फिर्याद दाखल

9 Particulars of properties of interest (संबंधित मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मूल्य (रु.)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य (रु. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र., जर असल्यास):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

मी, मोहम्मद युसुफ शेख, वय 65 वर्षे, धंदा: व्यापार, राहणार 706, आक्सा रेसिडेन्सी, रशिद कंपाउंड, कौसा, मुंब्रा, जि. ठाणे, मो. नं. 9869018594 समक्ष हजर राहून फिर्याद लिहून देतो की,

मी वर नमुद पत्त्यावर माझे परिवारासह राहणेस आहे. माझी मुंब्रा कौसा येथे इलेक्ट्रीक सामानाचे दुकान असून मी स्वतः सदरचे दुकान चालवितो. मी, माझा मुलगा तबरेज युसुफ शेख, याचे करीता दिनांक 19/04/2023 रोजी श्री. सलमान मोहम्मद रसुल शेख यांचेकडुन त्यांची आई कै. बतुलबी मोहम्मद रसुल शेख यांचे नावे असलेला रु. नं. 706, आक्सा रेसिडेन्सी, रशिद कंपाउंड, कौसा, मुंब्रा, जि. ठाणे हा फ्लॅट नोटरी करारनामा करून खरेदी केला आहे. त्यामध्ये मी माझे कुटुंबासह राहावयास आहे.

सदरचे फ्लॅट नंबर-706 ची टॅक्स पावती वर कै. बतुलबी मोहम्मद रसुल शेख यांनी ज्यांचेकडुन सदरचे घर घेतले त्या पुर्वीचे मालक फारूख इमान शेख यांचे नाव येत असल्याने टॅक्स पावती वर माझा मुलगा तबरेज युसुफ शेख याचे नाव नोंद होवुन मिळकतीची हस्तांतर नोंद ठाणे महानगर पालीकेच्या रेकॉर्डवर होण्याकरीता माझा मुलगा तबरेज याचे विहीत नमुन्यातील अर्ज भरून व त्यासोबत खरेदी व्यवहाराचे कागदपत्र जोडुन माझेकडे दिला होता. सदरचा अर्ज मी दि. 03/08/2023 रोजी दिवा प्रभाग समिती कार्यालयात जमा केला.

त्यानंतर मी दि.18/08/2023 रोजी मी चौकशी करीता दिवा प्रभाग समिती कार्यालयात गेलो असता रशिद कंपाउंड हा भाग कौसा उप विभाग कार्यालयाचे हद्दीत असल्याने आमचा अर्ज कौसा उप विभाग कार्यालय, कौसा कब्रस्तानचे जवळचे कार्यालयात पाठविला असल्याचे सांगुन तेथे चौकशी करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी चौकशी करीता कौसा उप विभाग कार्यालयात गेलो. तेथे कार्यालयातील लिपिक श्री गिरीश आहीर यांना भेटून मी माझे अर्जाबाबत चौकशी केली असता त्यांनी माझी फाईल त्यांचेकडे आली असल्याचे सांगुन मिळकतीचे हस्तांतर नोंद करून टॅक्स पावतीवर माझा मुलगा तबरेज युसुफ शेख याचे नाव नोंद करण्याकरीता माझेकडे 9,000/- रूपये लाचेची मागणी केली. मला माझे कामाबद्दल कोणालाही लाच द्यावयाची नसल्याने मी त्याबाबत दिनांक 21/08/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात तक्रार दिली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक विलास मते, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी आज दिनांक 22/08/2023 रोजी माझेकडे डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवून मला माझा मुलगा तबरेज युसुफ शेख व पंच साक्षीदार श्री. सुधीर सहारे यांचेसह 11:52 वा. श्री. गिरीश रतन अहिरे, लिपीक, कौसा उपप्रभाग कार्यालय, दिवा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना भेटण्याकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले त्यावेळी लिपीक श्री. अहिरे यांनी प्रथम माझेशी माझे अर्जाबाबत बोलणे केले. दरम्यान् माझा मुलगा तबरेज याने " अभी करने तो मेरा नाम.......... कभी तक रिफ्लेक्ट होगा." असे विचारले असता अहिरे साहेबांनी एक महिन्यात काम होईल असे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला मी काल त्यांना का नाही भेटलो, याबाबत विचारणा केली असता, काल सर्दी खुप होती व माझी तब्बेत ठिक नव्हती असे सांगितले. त्यानंतर श्री. अहिरे यांनी मला इशारा करुन "पेमेंट" असे विचारले. त्यावर मी " अभी पेमेंट का मै वही मै इसको बोला था अभी इससे लेके मेरे को करना पडेगा ना" असे बोलून मुलाकडून पैसे घेवून देणार असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री. अहिरे यांनी " आपने क्या बोला नही इसको सबकुछ, बोल दिया पहलेही, लेके भी आये थे, उनको देनेको टाईम नही मिला" असे बोलून मी मुलाला काही सांगितले नाही काय ? याबाबत माझेकडे विचारणा केली. त्यावर माझा मुलगा तबरेज याने मला त्याबाबत विचारणा केली असता, मी " इन्होने दस हजार बोले थे, तो बाद मे. फिर, नौ.. नौ हजार बोले " असे त्यास सांगितले. त्यावर माझा मुलगा तबरेज हा श्री. अहिरे यांना " आप अगर पुरा टेन थाउजन लोगे तो गये तो.." असे बोलत असताना

अहिरे यानी मला त्याबाबत सर्व माहिती आहे असे तबरेजला सांगुन आमचे कागदपत्रात एक पेपर मिसींग असल्याचे सांगितले. त्यावर तबरेज याने मॅजेस्ट्रेट कडील पेपर नसल्याचे सांगितले. व काम नक्की होईल का असे विचारले. त्यावर अहिरे यांनी '' हो गया है...जाएगा क्या...हो गया है ना... खाली इनसे पेमेंन्ट लेना का था और पेपर्स सबमिट करने का था.... और क्या '' असे बोलून आमचेकडून पैसे घेतल्यानंतर पेपर सबमीट करणार असल्याचे सांगितले. त्यावर मी '' इस नौ को कुछः अ...टजस्ट नही हो सकता है...'' असे विचारले व माझा मुलगा तबरेज यांने अहिरे यांनी आम्हाला खुप खर्च झाला असल्याचे सांगितले. त्यावर अहिरे यांनी '' हम लोगो तो उसका आसान तारीका धुंड के दे दिऐ..'' असे बोलून त्यांनी मधला मार्ग काढला असल्याचे सांगितले. त्यावर तबरेज याने आता काम झाले आहे का असे विचारले असता अहिरे यांनी हो ''गया है.. .अभी पेमेन्ट लेने का..'' असे सांगितले. त्यावर तबरेज यांनी '' अभी आपको तो कॅश ही चाहीऐ ?.. लेकीन कम तो करो.. दस, नौ..'' असे सांगितले व मी देखील '' नौ हजार बोले ना.. तो इस हिसाब से'' असे बोललो असता अहिरे यांनी '' क्या.. बोलू मे अब.. वो मॅजिस्टेट का नही, इसमे अॅग्रीमेन्ट नही है... पेपर नही है...बहोत सारे प्रोब्लम है...'' असे बोलून आमचे कागदपत्रात कमतरता असल्याचे सांगून त्यावर झालेल्या चर्चेअंती मी अहिरे यांना '' मै बोला सात हजार तक नही हो जाऐगा...'' असे पुन्हा विचारले असता अहिरे यांनी '' पाचसौ कम कर दो.. चलो...'' असे बोलून मागितलेल्या नऊ हजार रुपये रक्कमेतून पाचषे रुपये कमी देण्यास सांगितले. त्यावर मी पुन्हा खात्री करण्याकरीता साडे आठ हजार ? असे विचारले असता अहिरे यांनी '' साडे आठ करदो ...'' असे बोलून लाचेच्या रक्कमेत तडजोड करुन साडे आठ हजार रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना अर्ध्या तासात घेवून येतो असे सांगितले व तेथून निघून आलो.

अषा प्रकारे लिपीक श्री. गिरीश अहिरे यांनी माझेकडे लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस निरीक्षक विलास मते यांनी लागलीच लाचेचा सापळा आयोजित केला व मला सांगितल्याप्रमाणे मी लाचेच्या सापळा कारवाईकरीता वापरावयाची रक्कम म्हणून माझेकडील माझे व्यवसायाच्या वापरातले 8,500/- रुपये (500 रुपये दराच्या 17 नोटा) पोलीस निरीक्षक विलास मते यांचेकडे हजर केले. त्याप्रमाणे पो.नि. मते यांनी त्यांचे स्टाफचे मदतीने सदर नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून सापळापूर्व कारवाई पूर्ण केली.त्यानंतर लाचेच्या सापळा कारवाईस सुरवात करुन माझेकडे डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवून मला पंच साक्षीदार श्री. सहारे यांचेसह लिपीक गिरीश अहिरे याचे कौसा उप प्रभाग कार्यालयात 14:01 पाठविले. त्यावेळी लिपीक श्री. अहिरे यांनी '' पैसा लाया.. ?'' असे मला विचारले असता मी पैसे आणले असल्याचे सांगितले. त्यावर त्यांनी मला माझा मुलगा कोठे आहे असे विचारले व मला थोडे थांबण्यास सांगितले व ते दरवाजा जवळ जावून संशयाने पाहू लागले. त्यानंतर अहिरे यांनी त्यांचे परिचयाचे एका इसमास हाक मारली व ''इनको पैसा दे दो...'' असे बोलून सदर इसमाकडे पैसे देण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना ''किसको'' असे विचारले असता त्यांनी सदर इसमाकडे बोट केले. त्यावर मी सदर इसमाजवळ जावून ''इनको दे दू...'' असे विचारले असता त्यांनी '' हा...हा इनको दे दो... वो दे देगे बाद में....... दे दो इनको...'' असे बोलून त्याच व्यक्तीकडे पैसे देण्यास सांगितले. त्यावर मी सदर इसमास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी आपले नाव ''आसीम'' असे सांगितले. त्यावर मी '' आसिम भाई ये जो साहब बोल रहे है... आपको देने के लिऐ.. इसके लिऐ पुछा...गिनलो... '' असे आसीम यांना बोलून रक्कम मोजून घेण्यास सांगितली. त्यावर आसीम यांनी अहिरे यांचे सांगण्याप्रमाणे माझेकडून रक्कम घेवून ती मोजून ''साडे आठ है'' असे सांगितले. त्यावेळी अहिरे हे समक्ष हजर होते. तेव्हा मी आसीम यांना रक्कम बरोबर असल्याचे अहिरे साहेब यांना सांगण्यास सांगितले असता, त्यांनी '' ठिक है साहब '' असे मला सांगितले. त्याचवेळी सापळा पथकातील अंमलदार जवळ असल्याचे पाहून मी लाचेच्या रक्कमेची स्वीकृती झालेबाबतचा इशारा केला असता सापळा पथकातील पोलीस निरीक्षक विलास मते व त्यांचे स्टाफने लिपीक गिरीश अहिरे व खाजगी इसम आसीम शरीफ यांना 14:47 वा. ताब्यात घेतले आहे.

त्यानतर, पो.नि. विलास मते यांनी लिपीक गिरीश अहिरे व खाजगी इसम आसीम शरीफ यांना ताब्यात घेवून त्यांचे कौसा प्रभाग समिती कार्यालयात आणून त्यांचेकडे माझे समक्ष केलेल्या चौकशीमध्ये लिपीक यांनी त्यांचे 1) नाव गिरीश रतन अहिरे, लिपीक (वर्ग-3), कौसा दिवा उपप्रभाग कार्यालय, ठाणे महानगरपालिका, ठाणे, वय-53 वर्ष, राहणार- रु.नं.701 / 702, ओम साई टॉवर, पारसिक नगर, कळवा, ठाणे 2) आसीम इनायत शरीफ, खाजगी इसम, वय-51, राहणार- रु.नं.402, रशीदा अपार्टमेंट, डोंगरे नगर, कौसा, जिल्हा-ठाणे असे असल्याचे सांगितले.

तरी, मी दिनांक 21/08/2023 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, पोलीस निरीक्षक विलास मते यांनी दिनांक 22/08/2023 रोजी 11:19 वा. ते 14:47 वा. पावेतो कौसा उपप्रभाग कार्यालय, दिवा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे या ठिकाणी करण्यात आलेल्या पडताळणी-सापळापुर्व-सापळा पंचनामा कारवाईत, माझे मुलाचे नावे नव्याने खरेदी केलेल्या 706, आक्सा रेसिडेन्सी, रशिद कंपांऊड, कौसा, मुंब्रा, जि. ठाणे या फ्लॅटचे

टॅक्स पावतीवर माझा मुलगा तबरेज युसूफ शेख याचे नाव नोंद करुन मालमत्ता हस्तांतरणाची नोंद घेण्याकरीता लिपीक गिरीश रतन अहिरे, लिपीक (वर्ग-3), कौसा दिवा उपप्रभाग कार्यालय, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी माझेकडे 9,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 8,500/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन सापळा कारवाईचे वेळी त्याचेसमक्ष हजर असलेले त्यांचे परिचयाचे इसम आसीम इनायत शरीफ यांना सदरची रक्कम स्विकारण्यास सांगुन त्यांचे हस्ते 8,500/- रुपये लाच कौसा उप प्रभाग कार्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर स्विकारली असता लोकसेवक गिरीश अहिरे व खाजगी इसम आसीम शरीफ यांना पो.नि. विलास मते व त्याचे सापळा पथकाने 14:47 वा. रंगेहाथ पकडले. तरी माझी त्यांच्याविरुध्द कायदेशीर फिर्याद असून, त्यांचेविरुध्द कारवाई होणेस विनंती आहे.
माझी फिर्याद मराठीतून लॅपटॉपवर टंकलीखीत करण्यात आली असुन ती मी वाचून पाहिली असता, माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
~~KHA~~NDU K~~RISH~~NATH T~~AM~~BE PI / मते
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)